**ठळक बातम्या**

- रालोआचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा, इंडिया आघाडी आज उमेदवार ठरवणार

- बिहारमधल्या मतदारयाद्या पुनरीक्षणावर चर्चेची मागणी करत विरोधकांची संसदेत घोषणाबाजी, दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब

- देशात अनेक ठिकाणी पावसाचा जोर, महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, रायगडला रेड अलर्ट

- युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात आज चर्चा

**आणि**

- भालाफेकपटू नीरज चोप्रा याचा डायमंड लीगमधे प्रवेश निश्चित

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे विद्यमान8 राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं नाव घोषित करण्यात आलं आहे. भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. आघाडीतल्या सर्व सहकारी पक्षांनी या निर्णयाला पाठिंबा दिल्याचं सांगून, उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक सर्वपक्षीय सहमतीनं व्हावी यासाठी सर्व पक्षांशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. गेल्या आठवडाभरात आघाडीतील पक्ष आणि विरोधी पक्षांशी या संदर्भात चर्चा सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. संसदीय मंडळ सदस्यांसह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यासह संरक्षण मंत्री राजनाथ सिंह देखील यासंदर्भातल्या

बैठकीला उपस्थित होते. पुढील महिन्याच्या ९ तारखेला उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे.

राधाकृष्णन हे अनुभव समृद्ध असून, विविध पदांवर काम करताना त्यांनी समाजाची सेवा आणि उपेक्षितांना सक्षम बनवण्यावर भर दिल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही राधाकृष्णन यांच्या उमेदवारीचं स्वागत केलं आहे. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी राज्यपालांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं आहे. उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर राज्यपाल राधाकृष्णन आज दिल्लीला रवाना झाले.

**<><><><><>**

इंडिया आघाडी उपराष्ट्रपतीपदासाठी उमेदवाराची घोषणा आज करणार असल्याचं काँग्रेस महासचिव के सी वेणुगोपाल यांनी सांगितलं. आघाडीतल्या सर्व पक्षांशी चर्चा सुरू असून सहमतीने उमेदवार ठरवला जाईल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेली मतदार अधिकार यात्रा आज दुसऱ्या दिवशी बिहारच्या औरंगाबाद जिल्ह्यातल्या देव इथं पोहोचली. औरंगाबाद इथल्या सूर्य मंदिरात जाऊन गांधी यांनी दर्शन घेतलं.

बिहारमधील मतदार यादीत केल्या जाणाऱ्या विशेष पुनरिक्षण प्रक्रियेला विरोध करण्यासाठी मतदार अधिकार यात्रा काढली आहे. १६ दिवस चालणाऱ्या या यात्रेत इंडिया आघाडीतील विविध पक्षांचे नेते सहभागी होणार आहेत. ही यात्रा २० हून अधिक जिल्ह्यांत जाणार असून १ सप्टेंबर रोजी पटना इथल्या गांधी मैदानात समारोप सभा होईल.

दरम्यान, आज सकाळी राहुल गांधी यांनी औरंगाबादच्या अंबा, कुटुंबा, पातालगंगा आणि अन्य भागांचा दौरा केला. यावेळी त्यांच्यासोबत बिहार

विधानसभेतील विरोधी पक्ष नेते तेजस्वी प्रसाद यादव, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष राजेश राम आणि विकासशील इन्सान पार्टीचे प्रमुख मुकेश सहानी उपस्थित होते. राहुल गांधी आज गया इथं जाणार असून तिथं ते सभा घेणार आहेत. आहेत. त्याआधी ते गुरारू, बगडीहा, दाऊदनगर आणि पंचनापूर इथंही जाणार आहेत.

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आजही विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून सभागृहांमध्ये जोरदार घोषणाबाजी केली. राज्यसभेचं कामकाज सुरू होताच सभागृहाचे माजी सदस्य आणि नागालँडचे राज्यपाल ला गणेशन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर, विविध राजकीय पक्षांकडून १९ स्थगन प्रस्ताव मिळाले असून त्यातले काही बिहारच्या मतदार याद्या पुनरीक्षणाबाबतचे असल्याची माहिती हरिवंश यांनी दिली. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचं सांगून या सर्व सूचना त्यांनी फेटाळल्या. यानंतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. उपसभापतींनी शून्य प्रहर पुकारला, मात्र गदारोळ सुरूच राहिल्यानं त्यांनी राज्यसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केलं.

लोकसभेतही कामकाजाला सुरुवात होताच विरोधकांनी मतदार याद्या पुनरीक्षणावर चर्चेची मागणी करत घोषणाबाजी केली. या गदारोळातच अध्यक्षांनी प्रश्नकाल पुकारला. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबद्दल सरकार गंभीर असून राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना याबाबत वेळोवेळी मार्गदर्शक सूचना दिल्या जातात, अशी माहिती शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. दरम्यान, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी बिहारमधल्या मतदारयाद्यांच्या पुनरीक्षणावर चर्चा मागणी करत हौद्यात उतरत घोषणाबाजी सुरू केली. या सदस्यांनी सरकारी मालमत्तेचं नुकसान केलं, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दिला. मात्र, त्यानंतरही गदारोळ सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाजाला

पुन्हा सुरुवात झाल्यानंतर कागदपत्रं सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली, मात्र विरोधकांची घोषणाबाजी सुरूच राहिल्यामुळे कामकाज पुन्हा दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित करण्यात आलं.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे भारताचे पहिले अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्या या यशाबद्दल आणि विकसित भारत २०४७ च्या उद्दिष्टात अंतराळ कार्यक्रमाची महत्त्वाची भूमिका याबद्दल लोकसभेत आज विशेष चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आज मुसळधार पाऊस सुरु असून नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. अनेक धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यात पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. मुंबई आणि उपनगरात आज सकाळपासून जोरदार पाऊस सुरु आहे. आज सकाळी साडे ८ ते साडे ११ या तीन तासाच्या कालावधीत मुंबईत सांताक्रूझ वेधशाळेत सुमारे ४७ मिलिमीटर तर कुलाब्यात २९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. शहर आणि उपनगराच्या सखल भागात पाणी साचलं असून वाहतूक मंदावली आहे. हवामान विभागानं मुंबई शहर, उपनगर, ठाणे आणि रायगड जिल्ह्याला आज आणि उद्या अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे त्यामुळे मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांना आज दुपारच्या सत्रात सुटी जाहीर करण्यात आली आहे. आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावं, असं आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे. **नांदेड** जिल्ह्यात मुखेड तालुक्यात अतिवृष्टीमुळे लेंडी धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. काल इथं सुमारे २०६ मिलीमिटर पावसाची नोंद झाली. त्यामुळे रावनगाव, भासवाडी, भिंगेली, हासनाळ इथं जनजीवन प्रभावित झालं आहे. रावनगाव इथं

पुराच्या पाण्यात अडककेल्या २२५ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं आहे. ५ नागरिक बेपत्ता असून, त्यांचा शोध घेतला जात आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मिरमधील अनेक जिल्ह्यांत पुढील काही दिवस मुसळधार पाऊस आणि अचानक पूर येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. जम्मू, रेसई, उधमपूर, राजौरी, पूँछ, सांबा आणि कथुआ इथं मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर दोडा, किश्तवाड, रामबन इथं मुसळधार पाऊस आणि वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, मुसळधार पाऊस आणि पूरसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जम्मू इथली सर्व सरकारी कार्यालयं आणि शाळा बंद ठेवल्या आहेत. पर्यटकांना ही सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला आहे.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशात पावसाशी संबंधित विविध घटनांमध्ये आत्तापर्यंत मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २६३वर पोहोचली आहे. काल चंबा आणि कांगरा जिल्ह्यांमध्ये दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती राज्य आपत्ती संचालन केंद्रानं दिली. दरडी आणि अचानक आलेल्या पुरामुळे तीन राष्ट्रीय महामार्गांसह राज्यभरातले जवळपास ४०० रस्ते बंद आहेत.

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्तानात अलिकडेच आलेल्या पुरात मोठ्या प्रमाणावर जिवीतहानी झाल्याबद्दल संयुक्त राष्ट्राचे महासचिव अँटोनियो गुटेरस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. या पुरात ज्यांनी आपले जिवलग गमावलेत त्यांच्याप्रति गुटेरस यांनी शोक व्यक्त करत त्यांचं सांत्वन केलं आहे. संयुक्त राष्ट्राच्यावतीनं आवश्यक ती सर्व प्रकारची मदत करण्याचं आश्वासनही गुटेरस यांच्यावतीनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात दिलं आहे.

**<><><><><>**

युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की आज युरोपमधल्या काही नेत्यांसह अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत. रशियाच्या ताब्यात असलेल्या काही भागांवरचा दावा सोडावा, यासाठी ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांच्यावर दबाव वाढवला आहे. झेलेन्स्की यांची इच्छा असेल, तर ते रशियाविरुद्धचं युद्ध कोणत्याही क्षणी थांबवू शकतात, किंवा सुरू ठेवू शकतात, याचा पुनरुच्चार काल ट्रम्प यांनी केला.

**<><><><><>**

विद्यमान विश्वविजेता आणि दोनवेळा ऑलिम्पिक पदक पटकावणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा यानं डायमंड लीगच्या अंतिम फेरीतलं स्थान निश्चित केलं आहे. २७ आणि २८ ऑगस्ट रोजी स्वित्झर्लंडमध्ये ही स्पर्धा होईल. नुकत्याच झालेल्या सिलेसिया लीगमध्ये त्यानं भाग घेतला नसला, तरी या हंगामातली त्याची कामगिरी उत्तम असल्यामुळे तो डायमंड लीगसाठी पात्र ठरला. अँडरसन पीटर्स आणि लुईज मॉरिशिओ दा सिल्वा यांच्यासारखे त्याचे प्रतिस्पर्धीही या स्पर्धेसाठी पात्र ठरण्याच्या मार्गावर आहेत. नीरज चोप्रा यानं २०२२ मध्ये डायमंड लीगचं जेतेपद पटकावलं होतं, तर २०२३ आणि २०२४ मध्ये त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं.

**//<><><><><>//**